प्रति,

मा.अपर पोलीस महासंचालक
व कारागृह महानिरीक्षक,
महाराष्ट्र राज्य,पुणे -१.

जा.क्र.रविका/कारागृहवार्तापत्र/१५८३/२०१५ रत्नागिरी विशेष कारागृह दिनांक ३०/०७/२०१५

विषय :- महाराष्ट्र कारागृह वार्तापत्राबाबत.

संदर्भ :- मा.मुख्यालयाकडील पत्र जा.क्र.न्युजलेटर/मकावि/कक्ष-९/पुणे-१
दिनांक: ०१/०८/२०१४

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की,आज दिनांक ३०/०७/२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजता या कारागृहातील न्यायाधिन बंदी १)साग़र शांताराम कांबळे व २)शामराव भाऊराव जानकर यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रत्नागिरी यांच्या मार्फत व्हिडीओ कॅान्फरन्सिंगव्दारे कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन यशस्वीपणे करण्यात आले.

रत्नागिरी विशेष कारागृहामध्ये बंद्यांकरिता जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रत्नागिरी यांचेमार्फत कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन करण्यात येते. सदर मार्गदर्शनासाठी न्यायालयातील सन्मा.न्यायाधिश व वकील वर्ग कारागृहास प्रत्यक्ष भेट देऊन बंद्यांना मार्गदर्शन करीत असतात. आज प्रथमच कारागृहातील दोन न्यायाधिन बंद्यांना व्हिडीओ कॅान्फरन्सिंगव्दारे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

सदर कार्यक्रम सन्मा.प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधिश श्री.देबडवार साहेब यांचे अध्यक्षतेखाली झाला. कार्यक्रमास सन्मा.कुलकर्णी साहेब,मुख्य न्यायदंडाधिकारी,रत्नागिरी,सन्मा. माजगांवकर साहेब,न्यायदंडाधिकारी वर्ग-१ वरिष्ठ स्तर, रत्नागिरी तसेच इतर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

माहितीस्तव सविनय सादर.

आपला विश्वासू

३०/७/

(एस.आर.जाधव)
अधीक्षक
रत्नागिरी विशेष कारागृह
रत्नागिरी


# बंदिवान साधणार आता न्यायाधीशांशी थेट संवाद !

## जिल्हा कारागृहात शुभारंभ, राज्यातील पहिलाच उपक्रम, कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन मिळणार

**सौ.जान्हवी पाटील**
रत्नागिरी

कारागृहातील बंदिवानांना आता थेट न्यायाधीशांकडून व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन मिळणार आहे. अशी सुविधा देणारे रत्नागिरी जिल्हा विशेष कारागृह हे राज्यातील पहिले कारागृह ठरले आहे. यापुढील बंदिवानांची बहुतांश न्यायालयीन प्रकरणे थेट कॉन्फरन्सद्वारे होणार आहेत. कैद्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने कारागृह प्रशासनाने संपूर्ण राज्यात व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा सुरु करण्याचा निर्णय घेतल्याने बंदिवानांना आता तारखांसाठी वारंवार न्यायालयात हजर रहावे लागणार नाही.

जिल्हा कारागृहात गुरुवारी प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश बी. यू. देबडवार यांच्या



**रत्नागिरी : देबडवार यांच्याशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधताना कारागृह अधीक्षक जाधव. सोबत बंदिवान.**

हस्ते या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन सेवा सुरु करणारे रत्नागिरी जिल्हा विशेष

- **प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश देबडवार यांच्या हस्ते प्रारंभ**
- **अन्य कारागृहातही लवकरच व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा**
- **तारखांसाठी वारंवार जावे लागणार नाही न्यायालयात**

कारागृह राज्यातील पहिलेच कारागृह आहे. रत्नागिरी जिल्हा न्यायालय व जिल्हा कारागृह व्ही. सी. युनिटद्वारे जोडले आहे. यापुढील बंदिवानांची बहुतांश न्यायालयीन प्रकरणे थेट कॉन्फरन्सद्वारे होणार आहेत. या सुविधेमुळे कारागृह सुरक्षा हायटेक झाली आहे.

बंदिवानांना त्यांच्या तारखांसाठी वारंवार न्यायालयात जावे लागते. यावेळी बंदिवानांना पोलीस सुरक्षेत न्यायालयात हजर करावे लागते. कैद्यांच्या सुरक्षेच्यादृष्टीने कारागृह प्रशासनाने संपूर्ण राज्यात व्हिडिओ कॉन्फरन्स सुविधा सुरू करण्याचा निर्णय काही महिन्यांपूर्वी घेतला होता. या निर्णयाची अंमलबजावणी खऱ्या अर्थाने गुरुवारी झाली. कारागृहातून दोन बंदिवानांनी थेट रत्नागिरी जिल्हा न्यायाधीशांशी संवाद साधला. यावेळी पहिल्यांदाच व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे बंदिवान सागर शांताराम कांबळे आणि शामराव भाऊराव जानकर यांनी आपल्या समस्या न्यायाधीशांसमोर मांडल्या. यावेळी प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश देबडवार यांनी त्यांना कायदेविषयक सल्लाही दिला.

पान ६ पहा

पान १ वरुन

# बंदिवान साधणार आता न्यायाधीशांशी थेट संवाद !

व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे यापुढे बंदिवानांच्या केसेसच्या तारखा घेतल्या जाणार आहेत. न्यायालयात नेण्याची आवश्यकता भासल्यास तरच नेण्यात येणार आहे अन्यथा थेट कारागृहातून न्यायालयाशी संपर्क साधून संबंधित वकील बंदिवानाच्या खटल्याविषयी बोलणार आहे. तसेच कारागृह अधीक्षकांशी जिल्हा न्यायाधीश कधीही बोलू शकणार आहेत. ही सुरूवात कायदेविषयक मार्गदर्शन या उपक्रमाने झाली असून टप्प्याटप्प्याने आरोपींच्या तारखेच्या केसेसची सुनावणीही कॉन्फरन्सद्वारे होणार आहे.

उद्घाटनावेळी जिल्हा न्यायालयातून प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश देबडवार आणि रत्नागिरी जिल्हा कारागृह अधीक्षक संजय जाधव यांनी कारागृहातील सुविधांबाबत चर्चा केली. या चर्चेनंतर या व्हिडिओ कॉन्फरन्सचे उद्घाटन झाल्याचे देबडवार यांनी जाहीर केले. यावेळी मुख्य न्यायदंडाधिकारी कुलकर्णी, वरिष्ठ न्यायदंडाधिकारी माजगावकर व सरकारी वकील उपस्थित होते.

कारागृह अप्पर पोलीस महानिरीक्षक मीरा बोरवणकर या दर मंगळवारी राज्यातील सर्व कारागृह अधीक्षकांशी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधणार आहेत. यावेळी कारागृहातील समस्या, नवीन उपक्रम याविषयीही चर्चा करणार आहेत.

### पोलिसांचा ताण होणार कमी

एकंदरीत या सुविधेमुळे आता पोलिसांवरील ताणही कमी होणार आहे. आरोपीला कोर्टात तारखेसाठी नेण्यासाठी पोलिसांचा फौजफाटा असतो. तारखेसाठी दिवससुध्दा जातो. यापुढे काही मिनिटात ही सुनावणी पार पडेल आणि बंदोबस्त लागणार नाही. या प्रणालीत सुरळीतपणा येण्यासाठी थोडा कालावधी लागणार आहे.

### लवकरच टेलिमेडिसीन सेवा

या व्हिडिओ कॉन्फरन्स उपक्रमानंतर लवकरच टेलिमेडिसीन ही सेवाही कॉन्फरन्सद्वारे सुरू करण्याचा प्रस्ताव प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे औषध उपचार पध्दत पुढे आणण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांशी बोलणेही पूर्ण झाले आहे. त्यामुळे उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात वारंवार नेण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच राज्यातील इतर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्लाही यावेळी घेता येणार आहे.

### कॉन्फरन्ससाठी स्वतंत्र खोली

जिल्हा विशेष कारागृहात व्हिडिओ कॉन्फरन्ससाठी स्वतंत्र खोली तयार करण्यात आली असून याठिकाणी तीन मोठे एलसीडी लावण्यात आले आहेत. जेणेकरून आरोपी स्पष्टपणे दिसतील. व्हिडिओ कॉन्फरन्स उद्घाटनानंतर बंदिवानांशी झालेला संवाद यशस्वी ठरला.


### लवकरच टेलिमेडिसीन सेवा

या व्हिडिओ कॉन्फरन्स उपक्रमानंतर लवकरच टेलिमेडिसीन ही सेवाही कॉन्फरन्सद्वारे सुरू करण्याचा प्रस्ताव प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे औषध उपचार पध्दत पुढे आणण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा शल्य चिकित्सकांशी बोलणेही पूर्ण झाले आहे. त्यामुळे उपचारासाठी जिल्हा रूग्णालयात वारंवार नेण्याची आवश्यकता भासणार नाही. तसेच राज्यातील इतर तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांचा सल्लाही यावेळी घेता येणार आहे.